# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 256 दिनांक : २८.०१.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

विषय : - **उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/डीबीटी/१४०७ दि. २८.१.२०१९.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी **महाडीबीटी पोर्टल** वर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येतात. त्यानुसार कार्यालयीन संकेतस्थळावर तसेच ईमेलद्वारे पाठविण्यात आलेल्या विविध परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांना वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**तथापि सद्यस्थितीत आपल्या महाविद्यालयामधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची संख्या ही पात्र विद्यार्थीसंख्येच्या प्रमाणात खूप कमी आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर आहे. कोणत्याही महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

**तरी याबाबत पुनःश्च कळविण्यात येते की, शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. ३१.०१.२०१९ असून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज शक्य तितक्या लवकर भरणेसाठी कळविण्यात यावे. तसेच महाविद्यालयाच्या क्लर्क लॉगिन आणि प्रिंसिपल लॉगिन वर खूप जास्त प्रमाणात ऑनलाईन अर्ज प्रलंबित आहेत. तरी सर्व महाविद्यालयांनी क्लर्क लॉगिन आणि प्रिंसिपल लॉगिन वरील प्रलंबित ऑनलाईन अर्ज**

तपासणी करुन तात्काळ पुढील कार्यवाहीसाठी फॉरवर्ड करावेत. तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगिन वरील स्कीमसाठी पात्र झालेले परंतु अॅप्रुवलसाठी पाठविण्यात न आलेले अर्ज तात्काळ फॉरवर्ड करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करावी. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२० २६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 242 दिनांक : २५.०१.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-२०१८/ डीबीटी/१२६७ दि. २४.१.२०१९.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी **महाडीबीटी पोर्टल** वर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येतात. त्यानुसार कार्यालयीन संकेतस्थळावर तसेच ईमेलद्वारे पाठविण्यात आलेल्या विविध परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांना वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**तथापि सद्यस्थितीत शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांची संख्या ही पात्र विद्यार्थीसंख्येच्या प्रमाणात खूप कमी आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर आहे. तरी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. ३१.०१.२०१९ असून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज शक्य तितक्या लवकर भरणेसाठी कळविण्यात यावे.**

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना व इतर शिष्यवृत्तीसाठी **विशेषतः विधी, शिक्षणशास्त्र व शारिरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे अर्ज कमी प्रमाणात प्राप्त झालेले निदर्शनास येत असून, अशा महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचे महाविद्यालयामधील पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. तसेच संबंधित महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहित्ती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.**

सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे करिता

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/ 241 दिनांक : २५.०१.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. मुख्य सचिव, यांचे दि. २४.०१.२०१९ च्या बैठकीनुसार निर्देश.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी **महाडीबीटी पोर्टल** वर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येतात. त्यानुसार कार्यालयीन संकेतस्थळावर तसेच ईमेलद्वारे पाठविण्यात आलेल्या विविध परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांना वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**तथापि अनेक पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होऊनही त्यांचे खात्यावर शिष्यवृत्ती रक्कम जमा झालेलीनाही. तरी याबाबत शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांचे आधार संलग्नित बँक खात्यामध्ये देण्यात येणार असल्याने, ज्या विद्यार्थ्यांनी आधार अथवा विना आधार या पर्यायाचा वापर करुन शिष्यवृत्तीचे अर्ज भरले आहेत, अशा विद्यार्थ्यांना तात्काळ बँक खात्याशी आधार संलग्न (LINK) करणे आवश्यक आहे. ज्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देणे सोईचे होईल. तसेच शिष्यवृत्तीसाठी डीबीओद्वारे लाभ वितरित केल्यास रिडीम RIDEEM बटण विद्यार्थ्यांच्या लॉगीनवर सक्रिय होते. याबत विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन वेळोवेळी अर्जाची स्थिती तपासावी. आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांनी रिडीम RIDEEM बटणावर क्लिक करणे अत्यावश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांनी बँक खाते आधारसोबत लिंक आहे की नाही याबाबत त्यांच्या बँकेकडून खात्री करुन घ्यावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी विनाआधार ऑनलाईन अर्ज केला असेल तर त्या विद्यार्थ्यांचे बँक खाते सक्रिय आहे याबाबत त्यांच्या बँकेकडून खात्री करुन घ्यावी. तरी सदरची बाब सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना तात्काळ सूचनाफलकाद्वारे/परिपत्रकाद्वारे निदर्शनास आणून द्यावे. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळविण्यात यावा.**

सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे करिता

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३


क्र.उशिसं-२०१८/शा.सं.शिष्यवृत्ती/ १३५३ दिनांक-२५/०१/२०१९ 25 JAN 2019

प्रति,

१) सर्व विभागीय सहसंचालक कार्यालये.
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.
३) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, मुंबई.
४) संचालक, शासकीय विज्ञान संस्था, नागपूर
५) संचालक, शासकीय विज्ञान संस्था,औरंगाबाद.
६) प्राचार्य, शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती.
७) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर.

**विषयः- शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.**

संदर्भ:-१) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजना विभाग क्र. एससीएच १०८२/४१९९ / विशि-३ दि.१३ऑगस्ट, १९८५.
२) शासन निर्णय क्र. एस.सी.एच.२००३/(४०५/०३)/मशि-१ दि.०५फेब्रुवारी, २००४.
३) संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१८/शा.सं.शिष्यवृत्ती/परिपत्रक/ दिनांक-१९/१२/२०१८

राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एचडी. करता यावी या उद्देशाने ही शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्ती संदर्भीय शासन निर्णय १ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी एकूण १४ संच निर्धारीत केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे:-

**महाविद्यालयीन स्तरः-**

| | |
|---|---|
| १) शासकीय विज्ञान संस्था, मुंबई | ०३ |
| २) शासकीय विज्ञान संस्था, नागपूर | ०३ |
| ३) शासकीय विज्ञान संस्था,औरंगाबाद | ०३ |
| ४) शासकीय विदर्भ महाविद्यालय, अमरावती | ०१ |
| ५) वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर | ०१ |
| ६) राज्यातील विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यामधील विद्यार्थ्यांसाठी | ०३ |
| **एकूण-** | **१४** |

आपल्या महाविद्यालय /संस्था / विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी ऑन-लाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. सदर अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक ३१जानेवारी, २०१९ आहे. मात्र या शिष्यवृत्तीसाठी अद्यापपर्यंत फार कमी प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे आपण सदर योजनेची प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

तसेच सन २०१७-१८ यावर्षी सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१८-१९ साठी नुतनीकरणाचा अर्ज mahadbt portal वर online भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात.(पात्र विद्यार्थ्यांची यादी,संदर्भीय शासन निर्णय,संचालनालयाच्या **web: www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

तसेच सन २०१८-१९ मध्ये नवीन अर्ज सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीची माहिती देऊन mahadbt portal वर online अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहीत करावे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी आपल्या महाविद्यालयाकडून / संस्थेकडून या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसिध्दी करावी.

उपरोक्त विषयांबाबत संदर्भीय क्र. अन्वये आपल्याला सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वेळोवेळी दूरध्वनीवरुन आपल्याला संचालनालयाकडून कळविण्यात आलेले आहे. सदर योजनेसाठी पात्र असलेला विद्यार्थी या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचीत राहू नये याची दक्षता घेण्यात यावी.

**हरिभाऊ शिंदे**
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०१८/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/परिपत्रक/ 1352 दिनांक-२५/०१/२०१९ 25 JAN 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक/कुलसचिव,

यादीतील सर्व महाविद्यालये/संस्था/विद्यापीठे.

**विषय:- राज्यशासनाची दक्षिणा शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.**

**संदर्भ:-** १. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजना क्र.एससीएच-१०६५-यु. दि. १९/०९/१९६५.
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१८/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/१९५८०/ दिनांक-०४/१२/२०१८.
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०१८/दक्षिणा शिष्यवृत्ती योजना/परिपत्रक / २००२१/दि.१३/१२/२०१८.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेता यावे या हेतूने शासनाने संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये दक्षिणा शिष्यवृत्ती सुरु करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय स्तरासाठी ५४ व विद्यापीठ स्तरावर २२ असे एकूण ७६ संच निर्धारीत केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे

**महाविद्यालयीन स्तर**

| | |
|---|---|
| १. एलफिन्स्टन महाविद्यालय,मुंबई | ०६ |
| २. शासकीय विज्ञान संस्था,मुंबई | ०६ |
| ३. ईस्माईल युसुफ महाविद्यालय,मुंबई | ०४ |
| ४. सिडनहॅम महाविद्यालय,मुंबई | ०४ |
| ५. शासकीय विधी महाविद्याल,मुंबई | ०४ |
| ६. राजाराम महाविद्यालय,कोल्हापूर | ०६ |
| ७. शासकीय विज्ञान संस्था,नागपूर | ०६ |
| ८. शासकीय विज्ञान ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद | ०६ |
| ९. शासकीय ज्ञान विज्ञान संस्था,अमरावती | ०६ |
| १०. वसंतराव नाईक महाविद्यालय,नागपूर | ०६ |
| **एकूण-** | **५४** |

**विद्यापीठ स्तर**

| | |
|---|---|
| १. मुंबई विद्यापीठ,मुंबई | ०४ |
| २. पुणे विद्यापीठ,पुणे | ०४ |
| ३. नागपूर विद्यापीठ,नागपूर | ०४ |
| ४. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद | ०४ |
| ५. एस एन डि टी विद्यापीठ,मुंबई | ०२ |
| ६. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | ०४ |
| **एकूण-** | **२२** |

आपल्या महाविद्यालय/संस्था/विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी राज्यशासनाची दक्षिणा शिष्यवृत्तीचे सन २०१८-१९ साठी ऑन- लाईन अर्ज सादर करावयाचे आहेत. सदर अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक ३१/०१/२०१९ आहे. मात्र या शिष्यवृत्तीसाठी अद्यापर्यंत फार कमी प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे आपण सदर योजनेची प्रसिध्दी करुन सर्व विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

तसेच सन २०१७-१८ यावर्षी सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना सन २०१८-१९ साठी नुतनीकरणाचा अर्ज mahadbt portal वर online भरणेबाबत सूचना देण्यात याव्यात. सदर विद्यार्थ्यांची यादी संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये आपल्याला कळविण्यात आलेली आहे. तसेच ती यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१८-१९ मध्ये नवीन अर्ज सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीची माहिती देऊन mahadbt portal वर online अर्ज भरण्यासाठी प्रोत्साहीत करावे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी आपल्या महाविद्यालयाकडून या शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसिध्दी करावी.

उपरोक्त विषयांबाबत संदर्भीय क्र.२ व ३ अन्वये आपल्याला सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वेळोवेळी दूरध्वनीवरुन आपल्याला संचालनालयाकडून कळविण्यात आलेले आहे. सदर योजनेसाठी पात्र असलेला विद्यार्थी या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचीत राहू नये याची दक्षता घेण्यात यावी.

हरिभाऊ शिंदे
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत: सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण विभाग,
/-आपल्या विभागातील उपरोक्त महाविद्यालये, विद्यापीठे यांच्याकडे आपल्या स्तरावरुन पाठपुरावा करावा.